पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- १९/०९/२०१९

## गडचिरोली पोलीस दलाने लोकसहभागातुन दुरुस्त केला जांबिया नाला.

❖ अतिदुर्गम २५ ते ३० गावांना फायदा.

गेल्या काही दिवसापासुन गडचिरोली जिल्हयात अतिमुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे उपविभाग हेडरी अंतर्गत येणाऱ्या पोमके. गट्टा (जां.) हद्दीतील गट्टा ते एटापल्ली मार्गावरील जांबिया नाला पुरामुळे वाहुन गेला होता. गेल्या पंधरा दिवसांपासुन मौजा गट्टा (जां.), मौजा गर्देवाडा, मौजा हिदुर, मौजा हिकेर, मौजा तोरगट्टा, मौजा झारेवाडा, मौजा मोहंदी, मौजा हुडंसुर येथील जनतेला एटापल्ली या तालुक्याच्या ठिकाणी ये-जा करणे जिकीरीचे बनले होते. त्यामुळे या भागातील लोकांना जीवनावश्यक वस्तु तसेच हॉस्पीटलच्या सोयी सुविधेपासुन वंचित राहावे लागत होते.

सदर बाबीची दखल गट्टा (जां.) चे प्रभारी अधिकारी पोउपनि सुधीर पाडोळे यांनी घेवुन गट्टा (जां.) पंचक्रोशीतील नागरिकांची मिटींग घेतली. गट्टा (जां.) येथील अधिकारी व कर्मचारी आणि परिसरातील नागरिकांनी लोकसहभागातुन श्रमदान करून उत्स्फुर्तपणे भाग घेवुन जांबिया नाल्याची दुरुस्ती केली.

पोलीस दलाच्या या पुढाकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असुन, पोलीस दलाच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. याबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांनी पोमके गट्टा (जां.) चे अधिकारी, कर्मचारी तसेच पंचक्रोशीतील नागरिकांचे अभिनंदन केले आहे.









